रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जिवनहेतु हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद माने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## राज्यातील २६५ तालुके दुष्काळाच्या कक्षेत; 'ट्रिगर-१' लागू; १२ सवलतींचे कवच

### जालना जिल्ह्यातील सर्व ८ तालुक्यांचा समावेश; पीक पंचनाम्यांचे आदेश, नुकसानभरपाईसाठी स्वतंत्र निर्णय होणार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मागील अनेक दिवसांपासून पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे गंभीर संकटात सापडलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून, या तालुक्यांमध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील 'ट्रिगर-१' (प्रथम कळ) लागू करण्यात आली आहे. राज्याच्या सुमारे ७४ टक्के तालुक्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. कृषी आयुक्तांच्या २४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या अहवालाच्या आधारे मदत व पुनर्वसन विभागाने दुष्काळ जाहीर करण्याचा शासन निर्णय काढला आहे.

या निर्णयामुळे मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र तसेच कोकणातील काही भागांतील शेतकऱ्यांना विविध सवलती व उपाययोजनांचा मार्ग मोकळा झाला आहे. दुष्काळग्रस्त भागात पिकांचे नुकसान किती झाले आहे, याचे पंचनामे तातडीने पूर्ण करून त्यासंबंधीची माहिती शासनाला सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पंचनाम्याच्या वेळी पिकांची सद्यस्थिती दर्शविणारी छायाचित्रे तसेच नोंदविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची झळ पोहोचली असून विभागातील एकूण ७४ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर ९, जालना ८, बीड ११, लातूर १०, धाराशिव ८, नांदेड १४, परभणी ९ आणि हिंगोली ५ तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील सर्व आठ तालुके दुष्काळाच्या कक्षेत आले आहेत.

जालना जिल्ह्यासाठी हा निर्णय विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. खरीप हंगामातील पिकांना पावसाच्या प्रदीर्घ खंडाचा मोठा फटका बसला असून सोयाबीन, कापूस, मूग, उडीद यांसह विविध पिकांच्या उत्पादनावर परिणाम झाल्याची स्थिती आहे. आता शासनाच्या पंचनामा प्रक्रियेत प्रत्यक्ष शेतातील नुकसानीची नोंद होणे महत्त्वाचे ठरणार आहे. दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये शासनाने विविध सवलती आणि तातडीच्या उपाययोजना लागू केल्या




आहेत. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे.

१. जमीन महसुलात सूट : दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सवलत देण्यात येणार आहे.

२. पीक कर्जाचे पुनर्गठन : शेतकऱ्यांच्या पीक कर्जाच्या पुनर्गठनाची प्रक्रिया करण्यात येणार असून कर्जवसुलीबाबतही दुष्काळग्रस्त परिस्थितीनुसार उपाययोजना केल्या जाणार आहेत.

३. कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत : कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सवलतीची तरतूद करण्यात आली आहे. ७.५ हॉर्सपॉवरपर्यंतच्या पंपांना असलेल्या विद्यमान सवलतीपलीकडे अधिक क्षमतेच्या पंपांनाही सवलतीचा लाभ देण्यात येणार आहे.

४. वीज जोडणी खंडित न करण्याचे निर्देश : टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतीपंपांची वीज जोडणी खंडित होणार नाही, याची प्रशासनाने काळजी घेण्याचे निर्देश आहेत.

५. विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी : दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्यात येणार आहे.

६. पिण्याच्या पाण्यासाठी टँकर : ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होईल, तेथे आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

७. जनावरांसाठी चारा : दुष्काळग्रस्त भागातील पशुधनासाठी आवश्यक प्रमाणात चारा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली जाणार आहे.

८. रोजगार हमीच्या कामांना चालना : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांचे निकष शिथिल करून जास्तीत जास्त रोजगाराची कामे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

९. अन्नधान्याची उपलब्धता : शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी आणि शेतमजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात येणार आहे.

१०. जलसंधारणाची कामे : दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याचे निर्देश आहेत.

११. पिण्याच्या पाण्याचे नियोजन : प्रत्येक दुष्काळग्रस्त भागातील उपलब्ध पाणीसाठा, लोकसंख्या आणि गरज लक्षात घेऊन पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे.

१२. पीक नुकसानीचे पंचनामे : पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून छायाचित्रे, माहिती आणि अन्य आवश्यक तपशील शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये मराठवाड्याचा मोठा वाटा आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार विभागातील ७४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. त्याचवेळी विदर्भातील ९५ तालुके दुष्काळाच्या कक्षेत असून उत्तर महाराष्ट्रातील ४९ तालुक्यांचाही समावेश आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील (पान २ वर)

## सीमा पंच यांचा अग्रवाल महासभेतर्फे उत्कृष्ट सेवेबद्दल राष्ट्रीय स्तरावर गौरव

**जालना - प्रतिनिधी**

अखिल भारतीय अग्रवाल महासभा महिला प्रकोष्ठच्यावतीने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा सौ. सीमा अशोक पंच यांना त्यांच्या उल्लेखनीय आणि समर्पित समाजकार्याबद्दल नुकतेच सर्टिफिकेट ऑफ ऑनर देऊन सन्मानित करण्यात आले. अखिल भारतीय अग्रवाल महासभेच्या महिला प्रकोष्ठाच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती मृदुला अग्रवाल यांनी सौ. सीमा पंच यांच्या निरंतर सामाजिक कार्याची आणि समाजसेवेतील योगदानाची दखल घेऊन हा सन्मान जाहीर केला. सीमा पंच यांनी सातत्याने महिला सक्षमीकरण, समाजातील दुर्बल घटकांना मदत आणि सामाजिक ऐक्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवले आहेत. त्यांच्या याच निष्ठावंत आणि प्रेरक कार्याचा गौरव म्हणून राष्ट्रीय पातळीवरून हे सन्मानपत्र प्रदान करण्यात



आले. मृदुला अग्रवाल म्हणाल्या की, सीमा पंच यांचें कार्य अत्यंत प्रेरणादायी असून त्यांच्या कुशल व दूरदर्शी नेतृत्वाखाली महाराष्ट्रात अग्रवाल समाज अधिक संघटित, सशक्त आणि सक्षम बनेल, असा विश्वास व्यक्त व्यक्त करू त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सौ. सीमा पंच यांना मिळालेल्या या राष्ट्रीय बहुमानाबद्दल अखिल भारतीय अग्रवाल महासभा टीम, पंच परिवार, समाजातील विविध स्तरांतून, सामाजिक संस्था, मान्यवर तसेच महिला पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## काँग्रेसच्या दबावामुळे दुष्काळ जाहीर; मात्र शासनाचा निर्णय शेतकऱ्यांसाठी अपुरा खा.कल्याणराव काळे

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या वतीने सातत्याने करण्यात आलेल्या आंदोलनांमुळे शासनाला दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय घ्यावा लागला असल्याचे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे यांनी म्हटले आहे.मा. खासदार डॉ. कल्याणराव काळे व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा. कल्याणराव दळे यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने यापूर्वी जिल्हाधिकारी, जालना यांना निवेदन देऊन जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर जाफराबाद व मंठा येथे शेतकऱ्यांचा बैलगाडी मोर्चा, तर परतूर येथे ट्रॅक्टर मोर्चा काढून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली.सरकारकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने दिनांक १५, २३ व २४ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दुष्काळ पाहणी दौरे



आयोजित करण्यात आले. यावेळी संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदने देऊन तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी, जालना यांना देण्यात आले होते. या सातत्यपूर्ण आंदोलनांमुळे शासनावर दबाव निर्माण झाला आणि शासनाने दुष्काळ जाहीर केला. मात्र, शासनाने केलेली ही घोषणा तात्पुरती मलमपट्टी असून शेतकरी व इतर दुष्काळग्रस्त घटकांना अपेक्षित न्याय देणारी नाही, अशी भूमिका काँग्रेसने व्यक्त केली आहे. काँग्रेसच्या वतीने च्या नुकसानभरपाईच्या निकषांमध्ये बदल करून शेतकऱ्यांना हेक्टरी ₹७५ हजार आर्थिक मदत देण्यात यावी, फळबाग उत्पादक व पशुपालकांना भरघोस मदत द्यावी, विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता द्यावा, एक रुपयात पीकविमा योजना लागू करावी तसेच शेतकरी व शेतमजुरांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहे सरकारने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मा. खासदार डॉ. कल्याणराव काळे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ रोजी शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व पशुपालकांचा आक्रोश मोर्चा जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येईल. यानंतर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे यांनी दिली.

सदरील शासन आदेश संदिग्ध असून दुष्काळी परिस्थितीचा (पान २ वर)

## जालन्यात आज रंगणार माणिक मोती संगीत महोत्सव

### पं. नागेश आडगावकर यांच्या गायनाची रंगणार मैफल

**जालना - प्रतिनिधी**

सेवली गावचे पहिले लष्करी सैनिक आणि रसिक मर्मज्ञ कै. माणिकराव शंकरराव अग्निहोत्री (सेवलीकर) यांच्या पवित्र स्मृती प्रित्यर्थ आज, रविवार (दि. २७ सप्टेंबर) रोजी




जालन्यात माणिक मोती या भव्य संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जेईएस महाविद्यालयातील चुन्नीलाल जी. गोयल सभागृहात सायंकाळी ठिक ६.०० वाजता ही सांगितिक मैफल रंगणार असून पद्मविभूषण उस्ताद राशीद खाँ साहेब यांचे पट्टशिष्य पं. नागेश जी. आडगावकर आपल्या सुश्राव्य गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. या महोत्सवामध्ये पं. नागेश आडगावकर हे अभंगवाणी, नाट्यसंगीत आणि गझल अशा वैविध्यपूर्ण संगीत प्रकारांची मेजवानी रसिकांसमोर सादर करणार आहेत. त्यांना संवादिनीवर डॉ. प्रसाद चौधरी, बासरीवर निरंजन भालेराव, व्हायोलिनवर पंकज शिरभाते, तबल्यावर वेदांत कुलकर्णी तर पखवाजावर रोहित खवले हे कुशल वादक साथसंगत करणार आहेत. कलावर्धिनी जालना यांच्या वतीने आयोजित या (पान २ वर)

## धर्म व गौरक्षण हे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य बनले पाहिजे–स्वामी गोविंददेवगिरीजी

### *भव्य महाप्रसादाने श्रीमद् भागवत कथेची सांगता*

**जालना - प्रतिनिधी**

धर्मरक्षण आणि गोमातेच्या बचावासाठी संघटित होण्याची गरजच नव्हे ते प्रत्येक हिंदूचे आद्य कर्तव्य बनले पाहिजे. केवळ व्यक्तिगत विकास आणि मोक्ष शोधणे हा सनातन धर्माचा उद्देश नाही तर देश, धर्म आणि समाजाप्रती आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे हाच खरा धर्म आहे. संघटित आणि सक्षम समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने राष्ट्र उभारणीत योगदान दिले पाहिजे, असा प्रेरणादायी संदेश देत राष्ट्राचे जीवन उज्वल करून भारतमातेला वैभवच्या शिखरापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प आजच करा, अशी साद श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे महामंत्री तथा श्रीकृष्ण



जन्मभूमी न्यास, मथुराचे उपाध्यक्ष प. पू. राष्ट्रीय संत गुरुदेव स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी आज शनिवार दि. २६ सप्टेंबर रोजी श्रीमद् भागवत कथेच्या समारोपप्रसंगी उपस्थित हजारो भाविकांना घातली.

येथील मंठा रोड परिसरातील आईसाहेब लॉन्स येथे २० ते २६ सप्टेंबरदरम्यान भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने आयोजित श्रीमद्भागवत कथेची सांगता आज भव्य महाप्रसादाने झाली. प्रारंभी कथेचे मुख्य यजमान विष्णूकुमार चेचानी, दैनिक यजमान सुरेश अग्रवाल, समीर अग्रवाल आणि प्रसाद यजमान डॉ. विठ्ठल पवार यांनी सपत्नीक ग्रंथपूजन केले. आजच्या कथेला आ. बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, माजी आमदार संतोष सांबरे, माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर आदींनी उपस्थित राहून स्वामी गोविंददेव गिरीजी यांचे आशीर्वाद घेतले.

आधुनिक काळात विभक्त होत जाणारी कुटुंबे आणि पाश्चात्त्य प्रभावावर चिंता व्यक्त करत स्वामीजींनी सांगितले की, घराघरांत रामायण, महाभारत आणि भागवताचे संस्कार पोहोचणे आवश्यक आहे. वडील व्यवसायात तर आई टीव्हीत व्यस्त आहे. वास्तविक मुल हेच आपले धन असल्याने पालकांनी मुलांसोबत संस्कार आणि धर्मावर आधारित चाय पे चर्चा'' केली पाहिजे. त्यातून सदाचार, संस्कार यावर मंथन झाले पाहिजे. देशभक्ती काय असते, न्याय म्हणजे काय, याबाबत माहिती दिली पाहिजे. ''हम दो हमारे दो'' चा नारा जो - तो देत आहे. राष्ट्रधर्मासाठी चुकीचे आहे. माझ्या मते चार मुल असलेले दाम्पत्य आदर्श आहे. अन्यथा भविष्यात तुमच्यावर रडण्याची वेळ येईल, असा सूचक इशारा महाराजांनी दिला. त्रिवेंद्रम येथील आचार्य मनोजजी यांनी गेल्या २० वर्षात लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकलेल्या ८ हजार मुलींची घरवापसी केली, असे सांगत, माता पित्याने मुलीकडे थोडे जरी (पान २ वर)

## लॉजच्या खोलीत युवकाचा मृतदेह; हाताला सलाईन, शेजारी मद्याची बाटली अन् विषारी औषधाची बाटली

### खोलीचा दरवाजा आतून बंद; पोलिसांनी दरवाजा तोडून मृतदेह बाहेर काढला

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील बसस्थानक परिसरातील एका खासगी लॉजमध्ये युवकाचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत आढळून आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. मृत युवकाच्या हाताला सलाईन लावलेले होते, तर जवळच मद्याची बाटली आणि विषारी औषधाची बाटली आढळून आल्याने या घटनेचे गूढ अधिक वाढले आहे. दरम्यान, संबंधित खोलीचा दरवाजा आतून बंद असल्याचे आढळून आले. पोलिसांनी दरवाजा तोडून खोलीत प्रवेश केल्यानंतर युवक मृतावस्थेत आढळून आला.

ही घटना २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. बसस्थानक परिसरातील एका खासगी



लॉजमधील खोली बराच वेळ उघडत नसल्याने लॉज व्यवस्थापनाकडून पोलिसांना माहिती देण्यात आली.

माहिती मिळताच सदर बाजार पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संबंधित खोलीची पाहणी केली असता दरवाजा आतून बंद असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी दरवाजा तोडून खोलीत प्रवेश केला.

खोलीत एक युवक पालथ्या अवस्थेत मृतावस्थेत आढळून आला. त्याच्या हाताला सलाईन लावलेले होते. विशेष म्हणजे सलाईनची बाटली कापलेल्या अवस्थेत आढळून आली. मृतदेहाच्या शेजारी असलेल्या टेबलवर मद्याची बाटली तसेच विषारी औषधाची बाटली आढळून आली. त्यामुळे या घटनेबाबत विविध प्रश्न उपस्थित झाले आहेत.

घटनास्थळी आढळलेल्या आधारकार्डावरून मृत युवकाची ओळख निवृत्ती बाबूजी फरताडे (पान २ वर)

# संपादकीय...

## चोर पकडला, पण व्यापारी सुरक्षेचे काय?

जालना शहरातील नवीन मोंढा हा केवळ बाजारपेठ नाही, तर जिल्ह्याच्या व्यापारी अर्थव्यवस्थेची महत्त्वाची नाडी आहे. दिवसभर गजबजणारा हा परिसर रात्री मात्र तुलनेने शांत होतो. याच काळाचा गैरफायदा घेत होलसेल किराणा दुकानाच्या छतावरील पत्रे कापून दुकानात प्रवेश करून रोख रक्कम आणि किराणा माल लंपास करण्याची घटना घडली. सुदैवाने चंदनझिरा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत दोन दिवसांत संशयिताला ताब्यात घेतले आणि चोरीचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांची ही कारवाई निश्चितच तपास यंत्रणेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मात्र, चोर पकडला म्हणून प्रश्न संपत नाही; ज्या परिस्थितीत चोरी शक्य झाली, तो प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. चोरीची पद्धत लक्षात घेतली तर चोरट्याने दुकानाचे शटर किंवा मुख्य दरवाजा फोडण्याऐवजी छतावरील पत्रे कापून आत प्रवेश केला. याचा अर्थ दुकानाच्या सुरक्षेतील एका वेगळ्याच बाजूचा गैरफायदा घेतला गेला. व्यापाऱ्यांनी केवळ शटरला कुलूप लावले म्हणजे दुकान सुरक्षित झाले, अशी मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे. छत, मागील बाजू, खिडक्या, वेंटिलेशनची जागा, शेजारील मोकळी जागा अशा ठिकाणांचीही सुरक्षा तपासणे आवश्यक आहे. दुकानाचे शटर मजबूत असताना छत कमजोर असेल, तर सुरक्षा अपुरीच! या घटनेनंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे नवीन मोंढा परिसरातील रात्रीच्या सुरक्षा व्यवस्थेचा. व्यापारी परिसरात नियमित पोलिस गस्त किती आहे? संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत का? रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कोणती यंत्रणा आहे? व्यापाऱ्यांनी याबाबत पोलिसांकडे पूर्वी तक्रारी किंवा मागण्या केल्या आहेत का? या प्रश्नांची उत्तरे केवळ या एका चोरीपुरती मर्यादित नसून संपूर्ण व्यापारी सुरक्षेच्या दृष्टीने शोधली पाहिजेत. अनेक व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले असतात. मात्र कॅमेरा आहे म्हणजे सुरक्षा आहे, असा समज धोकादायक ठरू शकतो. कॅमेरा कार्यरत आहे का? रेकॉर्डिंग किती दिवस सुरक्षित राहते? रात्रीच्या अंधारात चित्र स्पष्ट दिसते का? दुकानाच्या छताकडे किंवा मागील बाजूकडे कॅमेऱ्याचे कव्हरेज आहे का? या बाबी तपासणे गरजेचे आहे. नवीन मोंढ्यासारख्या मोठ्या व्यापारी क्षेत्रात व्यापारी संघटना आणि पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे सुरक्षा ऑडिट करण्याची वेळ आली आहे. कोणत्या ठिकाणी प्रकाशयोजना अपुरी आहे, कुठे सीसीटीव्हीची गरज आहे, कुठे रात्रीची गस्त वाढवण्याची आवश्यकता आहे, याचे नकाशीकरण केले जाऊ शकते. सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी पोलिसांवर टाकून चालणार नाही. दुकान बंद करताना मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम गल्ल्यात ठेवणे टाळणे, मजबूत लॉकिंग सिस्टीम वापरणे, छताची नियमित तपासणी करणे, अलार्म किंवा इतर सुरक्षा साधनांचा वापर करणे आणि सीसीटीव्हीची नियमित तपासणी करणे, या उपाययोजना व्यापाऱ्यांनीही करणे आवश्यक आहे.

विशेषतः होलसेल बाजारपेठेत रात्री मोठ्या प्रमाणावर माल आणि रोकड असते. त्यामुळे अशा दुकानांची सुरक्षा सामान्य दुकानांपेक्षा अधिक मजबूत असणे अपेक्षित आहे. या प्रकरणात पोलिसांनी दुकानांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तपास पुढे नेला आणि संशयिताला ताब्यात घेतल्याचे सांगितले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. मात्र येथे एक महत्त्वाचा तपासाचा मुद्दा आहेव्यापारी परिसरातील दुकानांची अंतर्गत माहिती कोणाकडे असते? दुकान कधी बंद होते, गल्ल्यात पैसे कुठे ठेवले जातात, छताची रचना कशी आहे, रात्री कोणती वेळ सुरक्षित असते, दुकानात कोणत्या बाजूने प्रवेश करता येऊ शकतोअशी माहिती बाहेरील व्यक्तीला सहज उपलब्ध होते का, याचाही तपास होणे आवश्यक आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीला न्यायालयीन निर्णयापूर्वी दोषी ठरवणे योग्य नाही. पोलिस तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होणे महत्त्वाचे आहे. चंदनझिरा पोलिसांनी घटनेनंतर तपासाची दिशा निश्चित करून अवघ्या दोन दिवसांत संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती दिली आहे. चोरीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. अशा कारवायांमुळे गुन्हेगारांवर कायद्याचा धाक निर्माण होतो. पण गुन्हा घडल्यानंतर आरोपी पकडण्याइतकीच गुन्हा घडण्यापूर्वी तो रोखण्याची व्यवस्था महत्त्वाची आहे.

नवीन मोंढा, जुना मोंढा आणि शहरातील इतर व्यापारी भागांसाठी रात्रीची गस्त, सीसीटीव्ही नेटवर्क, पुरेशी प्रकाशयोजना आणि व्यापाऱ्यांशी थेट समन्वयाची यंत्रणा अधिक परिणामकारक करता येईल. नवीन मोंढ्यातील ही घटना एक इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. आज किराणा दुकान; उद्या दुसरे दुकान. चोरीची पद्धत बदलत आहे, त्यामुळे सुरक्षेची पद्धतही बदलली पाहिजे. महापालिका, पोलिस प्रशासन आणि व्यापारी संघटनांनी पुढाकार घेऊन नवीन मोंढ्याचे संयुक्त सुरक्षा ऑडिट करावे. रात्री अंधार असलेली ठिकाणे, सीसीटीव्हीविहीन भाग, प्रवेशाचे पर्यायी मार्ग, छतांवरील सुरक्षा, नियमित पोलिस गस्त आणि आपत्कालीन संपर्क व्यवस्था यांचा आढावा घ्यावा.

### जाहीर प्रगटन

जाहिर प्रगटन या जाहीर प्रगटनाद्वारे जालना शहर, नागेवाडी व परिसरातील सर्व संबंधित जनतेला कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. रोहन परशुराम यादव, रा. नागेवाडी, जालना, व त्यांचा परिवार यांनी खालील वर्णनाची मिळकत/जमीन तिचे मूळ मालक मथुराबाई मन्नू सावरकर, छोटीबाई किसन चौधरी, मुन्नीबाई रतनलाल बारवार, छोटेलाल किसन मदारे, हिरालाल किसन मदारे, मनोज किसन मदारे, विजया गेंदालाल अंधेरे अनिताबाई प्रभुलाल चौधरी धन्नोवाई लटरुलाल मदारे

यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले असून, त्याबाबतचा खरेदीचा व्यवहार निश्चित केला आहे. मिळकतीचे सविस्तर वर्णन: स्थानिक प्राधिकरण: जालना नगर महानगरपालिका हद्द.जालना, तालुका व जिल्हा:जालना.गट क्रमांक: ४७७/३/५एकूण क्षेत्रफळ: ५४.५८ R

चतुःसीमा: अधिकृत मंजूर नकाशा प्रमाणे पूर्वेस जालना अंबड रोड,पश्चिमेस सर्वे नं ४७७ उर्वरित जमीन उत्तरेस गाडी रस्ता, दक्षिणेस सर्वे नं ४७७ उर्वरित जमीनसदर मिळकतीवर/जमिनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हिस्सा, दान, गहाणखत, जामीन , वारसा हक्क, बँक कर्ज, कोर्ट वाद, किंवा इतर कोणताही बोजा अथवा आक्षेप असल्यास, त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रांच्या व लेखी पुराव्यासह आमच्याशी संपर्क साधावा.मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास, सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व वादविरहित आहे असे समजून आमचे पक्षकार श्री. रोहन परशुराम यादव हे पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही आक्षेपांची नोंद घेतली जाणार नाही व असे आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि.: २६ सप्टेंबर २०२६

ठिकाण: जालना : रोहन परशुर यादव पत्ता: मथुरा लॉन्स, नागेवाडी, जालना.

मोबाईल नंबर: ७६२०२५६६०३

**रोहन परशुराम यादव**

# बालाजी खोजे यांची अंबड बाजार समितीच्या उपसभापतीपदी निवड



**अंबड - प्रतिनिधी**

अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तथा भाजपा नेते सतीश घाटगे पाटील यांचे समर्थक श्री. बालाजी खोजे यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीचे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांनी स्वागत केले.

अंबड बाजार समितीचे दिवंगत उपसभापती अरुण घुगे यांच्या आकस्मिक निधनामुळे अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापतीपद रिक्त झाले होते. या रिक्त जागेसाठी शनिवारी निवडणूक घेण्यात आली. या पदासाठी भाजपकडून आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष नारायण कुचे व भाजपा नेते सतीश घाटगे यांनी बालाजी खोजे यांना उमेदवारी दिली होती. बाजार समितीत भाजपचे स्पष्ट बहुमत असल्याने बालाजी खोजे यांची बिनविरोध निवड झाली. बालाजी खोजे हे भाजपचे सक्रिय कार्यकर्ते असून, सतीश घाटगे पाटील यांचे निकटवर्तीय सहकारी आहेत. त्यांच्या निवडीमुळे अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजात त्यांना महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळाली आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन काम करतील, अशी अपेक्षा सतीश घाटगे यांनी यावेळी व्यक्त केली.

या निवडीबद्दल आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष नारायण कुचे, भाजपा नेते सतीश घाटगे आणि सभापती अवधूत नाना खडके यांच्यासह सर्व संचालक मंडळातील सदस्यांनी व भाजपा कार्यकर्त्यांनी बालाजी खोजे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# आपले मतदार वगळले जाणार नाही याकडे लक्ष द्या – संपर्कप्रमुख सुनिल पाटील

**जालना - प्रतिनिधी**

मी यादीवर काम करणारा कार्यकर्ता असून तुम्ही सुद्धा मतदार यादीवर काम केले पाहिजे, बीएलएच्या नेमणुकीकडे लक्ष देऊन एसआयआरमध्ये आपले मतदार वगळले जाणार नाही याकडे सर्व बीएलए यांनी काळजीपूर्वक लक्ष द्यावे, असे शिवसेना जालना लोकसभा संपर्कप्रमुख सुनिल पाटील यांनी लोकसभा मतदार संघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठकीप्रसंगी सांगितले. जालना जिल्ह्यात शिवसेनेचे गत वैभव पुन्हा प्राप्त करून देण्याचा संकल्प आपल्या सर्वांना घ्यायचा आहे. शिवसेनेत सर्वांचा सन्मान राखल्या जाईल काळजी नसावी आपण सर्व मिळून लोकसभा मतदारसंघ घडवू यासाठी प्रत्येकाने आपआपल्यावर असलेल्या जबाबदारीने कार्य करणे गरजेचे आहे. आपल्यावर पक्षाने दिलेल्या पदाला व जवाबदारीला न्याय देण्याचे काम करा. यापुढे मी तालुका स्तरावर बैठका घेणार असून प्रत्येक पदाधिकाऱ्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वच पदाधिकाऱ्यांनी संघटना बळकटीकरणासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहनही पाटील यांनी केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव यांनी गाव तिथे शिवसेना व घर तिथे शिवसैनिक हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. जालना लोकसभा मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला होता जालना,बदनापूर, सिल्लोड, पैठण या चार मतदारसंघात शिवसेनेचे आमदार होते. तीच परिस्थिती पुन्हा निर्माण करण्याचा आम्ही संकल्प घेत आहोत प्रत्येकालासोबत घेऊन संघटना वाढविण्यासाठी आम्ही सगळे सज्ज झालो आहे असे सांगितले.

## पान १ व ४ वरुन...

### राज्यातील २६५...

मिळून ३५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. दुष्काळ जाहीर झाल्याने सवलती लागू होणार असल्या तरी प्रत्यक्ष पीक नुकसानभरपाईसाठी पंचनामा प्रक्रिया निर्णायक ठरणार आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की पीक नुकसानीबाबतची प्रत्यक्ष आर्थिक मदत विहित कार्यपद्धती पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाईल. त्यामुळे दुष्काळ जाहीर झाल्यानंतर आता महसूल, कृषी आणि संबंधित यंत्रणांकडून होणाऱ्या पंचनाम्यांकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय आणि पीक नुकसानीची आर्थिक मदत मंजूर करण्याचा निर्णय हे दोन स्वतंत्र टप्पे आहेत. सध्याच्या शासन निर्णयामुळे दुष्काळग्रस्त भागांना विविध प्रशासकीय व सवलतींचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असला, तरी शेतकऱ्यांना मिळणारी प्रत्यक्ष नुकसानभरपाई किती असेल, त्यासाठी पात्रता काय असेल आणि निधी कधी वितरित केला जाईल, याबाबत स्वतंत्र शासन निर्णय अपेक्षित आहे. दुष्काळाची घोषणा झाल्यानंतर आता जिल्हा प्रशासनासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे पंचनामे, पाणीपुरवठा, चारा, रोजगार हमीची कामे आणि वीज सवलतींची प्रभावी अंमलबजावणी हे आहे. शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले असून दुष्काळ निवारणाच्या कामांचे समन्वय आणि आढावा घेण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेलाही सक्रिय करण्यात आले आहे.

राज्याच्या दुष्काळ व्यवस्थापन प्रक्रियेत विविध हवामान, पर्जन्यमान, पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि इतर निर्देशकांच्या आधारे दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन केले जाते. यातील 'ट्रिगर-१' हा दुष्काळी परिस्थिती ओळखण्याच्या प्रारंभिक टप्प्याशी संबंधित आहे. उपलब्ध अहवालानुसार यंदा अनेक भागांमध्ये प्रदीर्घ कोरडा कालावधी आणि पर्जन्यमानातील तूट यांसारखे निर्देशक दुष्काळी स्थितीकडे निर्देश करणारे ठरले.

राज्य सरकारने दुष्काळाची घोषणा करून विविध सवलतींची घोषणा केली असली, तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने आता सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो प्रत्यक्ष आर्थिक मदतीचा. खरीप हंगाम हातातून गेल्याने अनेक शेतकऱ्यांसमोर उत्पादन खर्च, कर्जाची परतफेड, पुढील हंगामाची तयारी आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह अशी अनेक आव्हाने उभी आहेत.

त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच पंचनामे वेगाने पूर्ण होऊन पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा होणे अपेक्षित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त भागांना मदत देण्याचे आश्वासन दिले असून प्रशासनाने नुकसानाची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली आहे. दुष्काळ जाहीर झाला; आता खरी कसोटी मदत शेतकऱ्यांच्या बांधावर आणि खात्यावर किती वेगाने पोहोचते, याची आहे.

### काँग्रेसच्या दबावामुळे...

सामना करणाऱ्या सर्व समाजघटकांना न्याय देण्याची भूमिका त्यामध्ये स्पष्टपणे दिसून येत नाही. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, हेक्टरी ₹७५ हजार आर्थिक मदत आणि पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असून ते अधिक तीव्र केले जाईल, अशी प्रतिक्रिया खा. डॉ. कल्याणराव काळे यांनी दिली.

### जालन्यात आज...

सांगीतिक सोहळ्यास सर्व संगीतप्रेमी व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अग्निहोत्री (सेवलीकर)परिवार आणि कलावर्धिनी जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### धर्म व गौरक्षण...

लक्ष दिले तर कुणी यात फसणार नाही. संस्कृती वाचवण्यासाठी मोठी शक्ती उभी करावी लागेल. बांगलादेशात जे घडले ते आपल्यासाठी फार दूर नाही, त्यामुळे सावध व्हा, असा संदेश त्यांनी दिला.

सज्जन कुणाला म्हणावे, यावर महाराज म्हणाले की, कुणाचे वाईट केले नाही, यालाच फक्त सज्जन म्हणता येणार नाही. कुणाचे तरी भले करण्याचा निदान प्रयत्न तरी केला आहे का? हा प्रश्न मनाला विचारा. अनेक समस्या आहेत. समाज घटत चालला आहे, गोहत्या होत आहेत, मंदिरे तोडली जात आहेत, घुसखोरी वाढली आहे, नद्या प्रदूषित होत आहेत, मुलींची संख्या कमी होत चालली आहे, अत्याचार वाढत चालले आहेत, अशा एक ना अनेक समस्या आहेत. त्यापैकी कोणतीही एक सोडविण्यासाठी पुढाकार घेणे हीच खरी ईश्वर सेवा आहे, असे महाराज म्हणाले. हल्ली भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. धर्मासाठी प्राप्त झालेले धन पचवण्यातचा प्रयत्न केल्यास तिसरी पिढी संपुष्टात येते तर नकळत जरी अशी चूक झाली तर नरकयातना भोगाव्या लागतात, असे सांगून महाराजांनी धर्म, संस्कृती, कौटुंबिक संस्कार आणि मूल्याधिष्ठित आचरणाचा संदेश दिला. सात दिवस भागवत श्रवण करणे हा केवळ धार्मिक सोहळा नसून चित्तशुद्धीचा मार्ग आहे. श्रीमद्भागवत हे साक्षात भगवान श्रीकृष्णाचे वाङ्मयी स्वरूप आहे. कथेतील विचार आणि संतांचे मार्गदर्शन जोपर्यंत आपण दैनंदिन व्यवहारात व आचरणात आणत नाही, तोपर्यंत कथेचे खरे फळ मिळत नाही. परीक्षित राजाची मुक्ती आणि शुकमुनींचा उपदेश याचे अत्यंत मार्मिक निरूपण स्वामीजींनी केले. मृत्यू हा अटळ असताना निर्भय कसे राहावे आणि भगवंताच्या चरणी संपूर्ण शरणागती कशी पत्करावी, हे राजा परीक्षिताच्या चरित्रातून शिकायला मिळते. भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या मानवाला अंतिम शांती केवळ हरीच्या नामात आणि आत्मज्ञानातच मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. शेवटी भक्ती ज्ञानगंगा श्रीमद्□ भागवत कथा समितीच्यावतीने मनोगत व्यक्त करताना शिवरतन मुंदडा यांनी सर्वांच्या सहकार्याने हा कथा महोत्सव यशस्वी करता आला. याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. या सात दिवसीय सोहळ्याचे सूत्रसंचालन कमलकिशोर मालपाणी यांनी केले.

शेवटी कथेचे मुख्य यजमान विष्णूकुमार चेचानी, दैनिक यजमान सुरेश अग्रवाल, समीर अग्रवाल यांच्यासह आ. बबनराव लोणीकर, माजी आमदार संतोष सांबरे, दैनिक आरती यजमान सौ. सुषमाताई पायगव्हाणे, छत्रपती संभाजीनगरचे बालाप्रसाद इंदानी, राज स्वामी यांच्याहस्ते सांगता आरती करण्यात आली.

### लॉजच्या खोलीत....

रा. तुपेवाडी-बावणे पांगरी अशी झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जालना शहरातील शासकीय सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. पथकाने लॉजमधील संबंधित खोलीची बारकाईने पाहणी केली. घटनास्थळावरील विविध वस्तू, परिस्थिती आणि उपलब्ध पुराव्यांची तपासणी करण्यात आली.

मृत्यूच्या नेमक्या कारणाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास केला जात आहे. युवकाने विषारी औषध प्राशन केले होते का, सलाईनचा या घटनेशी काय संबंध आहे, तसेच खोलीतील इतर परिस्थिती काय दर्शवते, याचा तपास केला जात आहे. दरवाजा आतून बंद असणे, हाताला सलाईन असणे आणि घटनास्थळी मद्याची तसेच विषारी औषधाची बाटली आढळणे या बाबींमुळे घटनेबाबत संशय निर्माण झाला आहे. मात्र हा प्रकार आत्महत्येचा आहे की यामागे घातपात आहे, याबाबत सध्या कोणताही निष्कर्ष काढण्यात आलेला नाही.

शवविच्छेदन अहवाल तसेच घटनास्थळावरून मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे पोलिस तपास पुढे जाणार असून, मृत्यूचे नेमके कारण तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. सदर बाजार पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

### पुढच्या वर्षी...

महापालिका, पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी जवळपास ३४ तास सातत्याने कार्यरत होते. विसर्जनस्थळी येणाऱ्या गणेश मंडळांचे नियोजन, मूर्तींची सुरक्षित हाताळणी, कृत्रिम कुंडांची व्यवस्था, स्वच्छता, वाहतूक नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी विविध पथके कार्यरत होती.

महापालिका आयुक्त अंजली शर्मा आणि पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जनाचे नियोजन करण्यात आले होते. महापालिका व पोलीस प्रशासनासोबत आरोग्य विभाग, होमगार्ड, महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा कर्मचारी आणि जीव रक्षक दलाचे सदस्यही विसर्जनस्थळी तैनात होते.

विसर्जनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर भाविक आणि गणेश मंडळे मोती तलाव परिसरात दाखल होत असल्याने स्वच्छता व्यवस्थेलाही विशेष महत्त्व देण्यात आले होते. विसर्जनस्थळ आणि मिरवणूक मार्गावर स्वच्छता कर्मचारी तैनात करण्यात आले होते. आरोग्य विभागाची पथकेही सज्ज ठेवण्यात आली होती. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने मदत मिळावी, यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवण्यात आला होता.

विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध सामाजिक संस्थांनीही प्रशासनाला सहकार्य केले. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, माऊली प्रतिष्ठान तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते विसर्जनस्थळी उपस्थित राहून प्रशासनाच्या व्यवस्थेला सहकार्य करत होते.

स्वयंसेवकांनी भाविकांना मार्गदर्शन करण्यासह गर्दीचे नियोजन, मूर्ती दान आणि अन्य बाबींमध्ये सहकार्य केले.

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या उत्साहानंतर गणरायाला निरोप देताना भाविकांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले होते. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात सार्वजनिक मंडळे आणि घरगुती गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाला निरोप दिला.

मिरवणुकीतील उत्साह, भक्तीभाव आणि प्रशासनाच्या नियोजनाचा समन्वय यामुळे जालना शहरातील विसर्जन सोहळा शांततेत पार पडला. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळे, गणेशभक्त, सामाजिक संस्था, स्वयंसेवक तसेच विसर्जन प्रक्रियेत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग नोंदविणाऱ्या सर्व यंत्रणा आणि नागरिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

तब्बल ३४ तास चाललेल्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत हजारो अधिकारी-कर्मचारी, पोलिस, सुरक्षा कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, जीव रक्षक, स्वयंसेवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या अथक परिश्रमामुळे जालना शहरातील गणेश विसर्जन सोहळा सुरळीतपणे पूर्ण झाला.

### मुख्यमंत्री सहाय्यता...

मुख्यमंत्री सहाय्यता निधी चा लाभ माझ्या सारख्या लाखो गोरगरीबांना मिळत आहे.मला मिळाला म्हणून ते शक्य झाले नसता माझ्या मुलाला अपंगच रहावे लागले अस्ते.यामुळे पुढील उपचार यशस्वी करण्या साठी प्रयत्न शील नावलौकिक असनारे श्री संतकृपा हॉस्पीटल जालन्याचे डॉ.पंढरीनाथ मांटे यांनी ऑपरेशन यशस्वी केल्याने राहुल जैस्वाल यांच्या पायावर उभे राहण्यासाठी मोलाचं योगदान दिलेआहे.या प्रसंगी दवाखान्यातील नर्स,व सर्व टीमनी चांगल्याप्रकारे प्रतिसाद दिला.

### जालन्यात तरुणाच्या...

असल्याच्या मुद्द्यावर आपण यापूर्वीही विधानसभेत आवाज उठवला असल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले. अल्पवयीन मुलांच्या वयासंदर्भात १५ वर्षांची मर्यादा आणण्याची मागणी आपण विधानसभेत केली होती, असे त्यांनी नमूद केले.

जालन्यातील अल्पवयीन मुलांच्या माध्यमातून गुन्हेगारी करवून घेण्याच्या मुद्द्यावर आमदार खोतकर यांनी यापूर्वीही विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला होता. जून २०२६ मधील विधानसभेतील चर्चेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा प्रकरणांत बालकांना फूस लावून किंवा प्रवृत्त करून गुन्हे करवून घेतल्यास टोळीसदृश बाबी आढळल्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत कारवाईची तरतूद करण्याचे सांगितले होते. खुनासारख्या गंभीर गुन्ह्यात दोषी ठरणाऱ्या व्यक्तींवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका आमदार खोतकर यांनी व्यक्त केली. खुनाच्या गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. ही मागणी त्यांनी मृत तरुणाच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर व्यक्त केली. मात्र, कोणत्याही प्रकरणात शिक्षा न्यायालयीन प्रक्रियेनंतर आणि लागू कायद्यानुसारच ठरते. जालना शहरात गणेश विसर्जनाची मिरवणूक सुरू असतानाच तरुणावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याने शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. गर्दीच्या आणि वर्दळीच्या परिसरात झालेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे.

गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी केवळ गुन्हा घडल्यानंतरची कारवाई पुरेशी नसून, गुन्हेगारीकडे वळणाऱ्या अल्पवयीन मुलांवर लक्ष ठेवणे, त्यांना गुन्हेगारीसाठी प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करणे आणि संवेदनशील भागात पोलिसांची प्रतिबंधात्मक उपस्थिती वाढवणे, या उपाययोजनांवरही भर देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

मियांसाहेब दर्गा परिसरातील या खून प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू असून, हल्ल्यामागील नेमके कारण, आरोपींची भूमिका आणि घटनेमागील पार्श्वभूमी तपासातून स्पष्ट होणार आहे. उपलब्ध प्राथमिक माहितीनुसार आर्थिक व्यवहाराशी संबंधित वादातून हल्ला झाल्याची माहिती काही वृत्तांत देण्यात आली आहे; मात्र या कारणाची अधिकृत पुष्टी तपास यंत्रणेकडून होणे बाकी आहे. दरम्यान, मृत तरुणाच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा आणि या घटनेतील दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी होत आहे. या घटनेमुळे जालना शहरातील गुन्हेगारी आणि विशेषतः गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीनांच्या संभाव्य सहभागाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

# भूजल व्यवस्थापनासाठी शाश्वत उपाययोजनांवर भर

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील घटती भूजल पातळी लक्षात घेता कृत्रिम भूजल पुनर्भरण, योग्य पीक पद्धती व सूक्ष्म सिंचनाचा अधिकाधिक वापर करण्याची गरज केंद्रीय भूजल मंडळाच्या एकदिवसीय कार्यशाळेत व्यक्त करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय जलधारक स्तर नकाशांकन व व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत जालना जिल्ह्याचा अहवाल अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आला.



केंद्रीय भूजल मंडळ, नागपूर, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जालना, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात ही कार्यशाळा घेण्यात आली. जिल्ह्यातील भूजल पातळीत घट होण्यामागे मागील १५ वर्षांतील पर्जन्यमानातील घट, सिंचन विहिरींच्या संख्येत झालेली वाढ व भूजलाचा वाढता उपसा ही प्रमुख कारणे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. भूजल पातळीत सातत्याने घट होत राहिल्यास भविष्यात भूजल उपलब्धतेची परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. भूजल संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी कृत्रिम भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. पुनर्भरणासाठी योग्य स्थळांची निवड करताना भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच केंद्रीय भूजल मंडळाचे तांत्रिक मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. योग्य ठिकाणी पुनर्भरण संरचना उभारल्यास भूजल पातळी वाढण्यास व भूजल साठ्याचे संवर्धन करण्यास मदत होऊ शकते. केंद्रीय भूजल मंडळ संपूर्ण भारतात, तर भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा महाराष्ट्रात जिल्हास्तरावर भूजलविषयक कार्य करते.

जालना जिल्ह्यातील भूजलाच्या गुणवत्तेत होत असलेली घसरण व त्याचे संभाव्य दुष्परिणाम याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. शेतीत रासायनिक खतांचा अतिवापर तसेच कीटकनाशके व इतर रसायनांचा अयोग्य वापर केल्यास जमिनीत नायट्रेटचे प्रमाण वाढू शकते. नायट्रेट भूजलात मिसळल्यास पाण्याच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. नायट्रेटयुक्त पाण्याच्या वापरामुळे विशेषतः लहान बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन मेथेमोग्लोबिनेमियासारख्या आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. भूजलाच्या अतिवापरामुळे जमिनीची क्षारता वाढून पिकांच्या वाढीवर व मातीच्या पाणीधारण क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. उपलब्ध भूजल संसाधनांची स्थिती लक्षात घेऊन योग्य पीक पद्धतीचा अवलंब, पिकांच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन पीक नियोजन तसेच ठिबक व तुषार सिंचनाचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. उपलब्ध भूजलाचा योग्य व काटकसरीने वापर, भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजना तसेच पीक व सिंचन पद्धतीत आवश्यक बदल याबाबतही कार्यशाळेत माहिती देण्यात आली. केंद्रीय भूजल मंडळाचे भूजल वैज्ञानिक अधिकारी हितेश रामटेके, शालिनी तिवारी व चित्रांश कोठारी यांनी मार्गदर्शन केले. केंद्रीय भूजल मंडळाच्या संकेतस्थळावरील माहितीच्या आधारे जालना जिल्ह्यातील भूजल संसाधनांचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन, संवर्धन व नियोजन करण्यासाठी राष्ट्रीय जलधारक स्तर नकाशांकन व व्यवस्थापन कार्यक्रमाचा अहवाल उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

कार्यशाळेस कृषी, जलसंपदा, मृद व जलसंधारण, लघु पाटबंधारे तसेच सिंचन व ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेच्या आयोजनासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. कैलास आहेर, सहाय्यक भूवैज्ञानिक गिरीधरा सी.एच., डॉ. कृष्णा देशपांडे, कनिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. संदीप सिरसाट, मोहसीन शेख तसेच अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लिटल स्टार इंग्लिश स्कूल माहोरा येथे गणरायाला भावपूर्ण निरोप....

*विद्यार्थ्यांच्या भक्तिमय वातावरणात महाआरती; "बाप्पा, पुढच्या वर्षी लवकर या...!"चा जयघोष*

**जाफराबाद - प्रतिनिधी**

माहोरा येथील लिटल स्टार इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या वतीने मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने विराजमान करण्यात आलेल्या लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. गणपती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी गणरायाची महाआरती शाळेच्या प्राचार्या अनिता नवले मॅडम यांच्या हस्ते मोठ्या भक्तिभावाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनीही महाआरतीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत गणरायाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतला. गणरायाला निरोप देताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साहासोबतच भावुकता दिसून आली. "गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या!" या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. यावेळी बाप्पाच्या चरणी नतमस्तक होऊन सर्व विद्यार्थ्यांना सुख, समाधान, उत्तम आरोग्य, यश आणि समृद्धी लाभावी, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम जडणघडणीत धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक व्हावी, या भावनेतून शाळेत गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. अखेर "बाप्पा, पुढच्या वर्षी लवकर या!" अशी भावपूर्ण साद घालत लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला.

# राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा

**भोकरदन - प्रतिनिधी**

स्व. ॲड. भाऊसाहेब देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, जोमाळा येथे २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना () स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात एनएसएस ध्वजाच्या ध्वजारोहणाने झाली.प्राचार्य डॉ. विश्वास तळेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात त्यांनी 'मी नव्हे तर तुम्ही' या ब्रीदवाक्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी समाजसेवा, राष्ट्रप्रेम व नेतृत्वगुण जोपासावेत, असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य के. एस. अपार, रोशन देशमुख, एच. व्ही. नागरगोजे व ऋषिकेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वयंसेवक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी समाजहिताची प्रतिज्ञा घेतली.



# मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम

हिंदी चित्रपटसृष्टीतील मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम यांचा आज स्मृतिदिन. सहा वर्षापूर्वी २५ सप्टेंबर २०२० रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी एस पी बालसुब्रमण्यम यांचे कोरोनाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने रसिकांनी हळहळ व्यक्त केली होती कारण एस पी बालसुब्रमण्यम हे रसिकांचे आवडते पार्श्वगायक होते. त्यांचे निधन रसिकांना चटका लावून जाणारे ठरले. एस पी बालसुब्रमण्यम यांचा जन्म ४ जून १९४६ रोजी आंध्रप्रदेश मधील नेल्लोर येथील मेहुआ या गावी झाला. त्यांचे पूर्ण नाव श्रीपती पंडितराध्युला बालसुब्रमण्यम असे होते. एस पी बालसुब्रमण्यम यांचे वडील हरिकथा गायक होते. आंध्रप्रदेश मधील हे पारंपरिक लोकसंगीत आहे त्यात कविता, कथा, गायन, नृत्य यासह सर्व प्रकारांचा समावेश असतो. एस पी बालसुब्रमण्यम यांचे वडील नाटकातही काम करत. एस पी यांना एक भाऊ व दोन बहिण आहेत. एस पी यांनी मोठे होऊन इंजिनिअर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती पण ती पूर्ण होऊ शकली नाही. एस पी बालसुब्रमण्यम यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती त्यामुळे त्यांनी गायनातच करिअर करायचे असे ठरवले आणि त्यांनी व्यावसायिक गायनास सुरुवात केली. १९६४ साली त्यांना गायनात पहिले पारितोषिक मिळाले. त्यानंतर त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. सुरुवातीला त्यांनी आपल्या मातृभाषेत म्हणजे तेलगू भाषेत गाणी गायला सुरुवात केली नंतर त्यांनी तमिळ, मल्याळम आणि कन्नड या दक्षिण भारतीय भाषेतही गाणी गायला सुरुवात केली. दक्षिणात्य भाषेत त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लगली. त्याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढू लागली. त्यांच्या मंजुळ आवाजाने रसिकांना वेड लावले. त्यांचा आवाज आणि त्यांनी गायलेली गाणी रसिकांना इतकी आवडली की रसिकांनी त्यांना दक्षिणेतील. मोहम्मद रफी अशी पदवी दिली. दक्षिणेकडून त्यांनी आपला मोर्चा हिंदी चित्रपट सृष्टीकडे वळवला. हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केल्यावर त्यांना एक दुजे के लिये या चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. आजही या चित्रपटातील त्यांनी गायलेली गाणी प्रेक्षकांच्या ओठावर आहेत. या चित्रपटात त्यांनी गायलेले हम बने तुम बने एक दुजे के लिये.... या गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एस पिंच्या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे नाव देशभर झाले. एस पी बालसुब्रमण्यम यांनी गायलेल्या पहिल्याच चित्रपटातील गाणी गाजल्याने त्यांना अनेक चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. अनेक संगीतकार त्यांना आपल्याकडे गाणी गाण्यासाठी गळ घालू लागले. पुढे त्यांनी अनेक चित्रपटात गाणी गायली ती गाणी लोकप्रियही झाली. हिंदी चित्रपट सृष्टीत त्यांचे आता चांगले बस्तान बसले. पत्थर के फुल, बागी, हम आपके है कौन? साजन, रोजा या चित्रपटात त्यानी गायलेली गाणी खूप गाजली. सलमान खानचा पहिला चित्रपट असलेल्या मैने प्यार किया या चित्रपटात त्यांनी सलमानचा आवाज बनून गाणी गायली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. सलमान खानला सुपरस्टार करण्यात एस पी बालसुब्रमण्यम यांचा मोलाचा वाटा होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सलमान खानच्या अनेक गाण्यांना त्यांचाच आवाज होता. सलमान खान आणि एस पी हे जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू होते. १९९० च्या दशकात त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली. एस पी यांनी १६ भाषांमधून ४० हजारांहून अधिक गाणी गायली. ८ फेब्रुवारी १९८१ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ अशा १२ तासात तब्बल २१ कन्नड गाणी रेकॉर्ड करून त्यांनी विश्वविक्रम केला जो गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदला गेला. एस पी यांनी जवळपास पाच दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या आवाजाची मोहिनीच अशी होती की जो त्यांचा आवाज ऐकेल तो त्यांच्या प्रेमात पडेल. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांना तब्बल अर्धा डझन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. शिवाय अनेक फिल्मफेअर, स्क्रीन पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवले. रसिकांचे आवडते आणि रसिकांच्या मनात आदराचे स्थान असलेल्या या गायकाचे कोरोनाने अचानक निधन झाल्याने रसिकांना मोठा धक्का बसला होता. मंजुळ आवाजाचे जेष्ठ पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# गुगल गुरू चा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव बॅकरब असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

**जालना - प्रतिनिधी**

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. श्री. राणे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मोटारीने (समृद्धी महामार्ग) राजेवाडी तलाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी १२.३० ते १.०० वाजता राजेवाडी तलाव येथे आगमन, तलावाची पाहणी तसेच मच्छीमारांसमवेत चर्चा करतील. दुपारी १.०० वाजता मोटारीने सोमठाणा तलाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी १.१५ ते १.४५ वाजता सोमठाणा तलाव येथे आगमन, तलावाची पाहणी तसेच मच्छीमारांसमवेत चर्चा करतील. दुपारी १.४५ वाजता मोटारीने आमदार नारायण कुचे यांच्या संपर्क कार्यालयाकडे, कृषी महाविद्यालयासमोर, बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी २.०० ते ३.०० वाजता राखीव.

दुपारी ३.०० वाजता मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात प्रभारी तहसीलदार तुषार निकम यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार विक्रांत मोंढे, सतीश तायडे, पी. डी. शिंदे, सहाय्यक महसूल अधिकारी दीपली राऊत (वानखडे) तसेच संपदा कुलकर्णी, जे. जे. वाघ, एस. एस. भोकरे, वृषाली नवले, रिना नगरकर, रवींद्र हेलकट, देशपांडे व अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शौर्य दिन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

शौर्य दिनानिमित्त मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, माजी सैनिक, विधवा, त्यांचे अवलंबित व नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. भारतीय सैन्यदलाने २९ सप्टेंबर रोजी पाकिस्तानच्या हद्दीत प्रवेश करून केलेल्या कारवाईत अतिरेक्यांचा खात्मा केला.

भारतीय सैन्यदलाची ही शौर्यपूर्ण कामगिरी जनतेपर्यंत पोहोचविणे व माजी सैनिकांचा यथोचित सन्मान करणे, या उद्देशाने राज्य शासनाने २९ सप्टेंबर हा दिवस शौर्य दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आहे.

# गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव दाखल करण्यास ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दी वगळून ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने झालेला भूखंड विकास नियमित करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याची मुदत ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आली आहे. नागरिकांनी या मुदतीत गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्रस्ताव दाखल करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत ३१ डिसेंबर २०२० पूर्वीचे अनधिकृत भूखंड व अनधिकृत भूखंडावरील बांधकाम नियमाधीन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दी वगळता उर्वरित ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने झालेला भूखंड विकास नियमित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील गुंठेवारी कक्षात प्रस्ताव दाखल करण्याची मुदत यापूर्वी ३० जून २०२६ पर्यंत होती. आता ही मुदत ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

निर्धारित मुदतीत प्रस्ताव दाखल न केल्यास किंवा गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र न घेता अनधिकृत भूखंडाची खरेदी-विक्री केल्यास तसेच संबंधित जागेवर अनधिकृत बांधकाम केल्यास ते अतिक्रमण समजण्यात येईल.

अशा अनधिकृत व विनापरवाना बांधकामांविरुद्ध महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदींनुसार बांधकाम पाडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांनी मुदतीत प्रस्ताव दाखल करून गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, असे आवाहनही श्रीमती मित्तल यांनी केले आहे.

# पुढच्या वर्षी लवकर या...



## २४ तास शहरातून मिरवणुका, महापालिका-पोलीस प्रशासनासह विविध यंत्रणांचा चोख समन्वय



## ३४ तास अखंड यंत्रणा कार्यरत; भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप



## ५१९ सार्वजनिक गणेश मंडळांसह ७० हजार घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन





**जालना । प्रतिनिधी - 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात जालना शहरातील श्री गणेश विसर्जन सोहळा भक्तिमय आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडला. सार्वजनिक गणेश मंडळांच्या भव्य मिरवणुकांसह घराघरातील आणि विविध व्यावसायिक प्रतिष्ठानांमधील गणरायालाही भावपूर्ण निरोप देण्यात आला. तब्बल ३४ तास अखंड सुरू असलेल्या विसर्जन प्रक्रियेत ५१९ सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींसह अंदाजे ७० ते ८० हजार घरगुती व व्यावसायिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.**

जालना शहरातील गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग, होमगार्ड, महाराष्ट्र सुरक्षा मंडळ, जीव रक्षक दल तसेच विविध सामाजिक संस्थांनी केलेल्या नियोजनबद्ध कामामुळे संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पडली. विशेष म्हणजे, शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकीचा उत्साह जवळपास २४ तास कायम राहिला, तर विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.२० वाजेपर्यंत विसर्जनाची प्रक्रिया सुरू होती. जालना शहर महानगरपालिकेने मोती तलाव येथील विसर्जन कुंड परिसरात गणेशमूर्ती विसर्जनासाठी विशेष व्यवस्था केली होती. २५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता विसर्जन प्रक्रियेला सुरुवात झाली. सार्वजनिक मंडळांच्या मूर्तींच्या मिरवणुका शहरातील विविध भागांतून मार्गक्रमण करत मोती तलाव परिसराकडे येत होत्या.

मिरवणुकीत ढोल-ताशे, पारंपरिक वाद्ये, गणेशभक्तांचे जयघोष आणि भक्तिमय वातावरण यामुळे शहरातील वातावरण गणेशमय झाले होते. मोठ्या सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत होती. त्यामुळे विसर्जनाची प्रक्रिया सातत्याने सुरू ठेवण्यासाठी प्रशासनाने अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रणा तैनात केली होती. जालना शहरातील एकूण ५१९ सार्वजनिक गणेश मंडळांच्या श्री गणेश मूर्तींचे विसर्जन पूर्ण करण्यात आले. मोठ्या मूर्ती सुरक्षितपणे विसर्जित करण्यासाठी मोती तलाव येथील विसर्जन कुंडावर ६ क्रेनची व्यवस्था करण्यात आली होती. क्रेनच्या सहाय्याने मोठ्या मूर्तींचे सुरक्षितरीत्या विसर्जन करण्यात आले.

सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींसोबतच शहरातील घरगुती गणेशोत्सव तसेच दुकाने, व्यावसायिक प्रतिष्ठाने आणि अन्य आस्थापनांमध्ये विराजमान झालेल्या गणेशमूर्तींचेही विसर्जन करण्यात आले. महापालिकेच्या माहितीनुसार, घरगुती व व्यावसायिक प्रतिष्ठानांमधील अंदाजे ७० ते ८० हजार गणेशमूर्तींच्या विसर्जनाची प्रक्रिया पार पाडण्यात आली.

घरगुती गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी महापालिकेने १० कृत्रिम विसर्जन कुंड उपलब्ध करून दिले होते. यामुळे मोठ्या विसर्जन कुंडावरील गर्दी कमी करण्यास मदत झाली. पर्यावरणपूरक पद्धतीने मूर्ती विसर्जनाला प्रोत्साहन देण्यासाठी मूर्ती दानाची व्यवस्थाही करण्यात आली होती. यासाठी स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली होती. गणेश विसर्जनाच्या दिवशी शहरातील विविध भागांतून निघालेल्या गणेश मंडळांच्या मिरवणुका जवळपास २४ तास सुरू होत्या. मिरवणुका शांततेत पार पडाव्यात, वाहतूक सुरळीत राहावी आणि गर्दीच्या ठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाने व्यापक बंदोबस्त तैनात केला होता. पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, विक्रम साळी, अनंत कुलकर्णी आणि पंकज जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि पोलिस कर्मचारी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मिरवणुकीच्या मार्गावर वाहतूक नियोजन, गर्दीचे नियंत्रण आणि मंडळांच्या हालचालींचे व्यवस्थापन करण्यासाठी पोलिस यंत्रणा सातत्याने कार्यरत होती.

३४ तास अधिकारी-कर्मचाऱ्यांची धावपळ विसर्जन प्रक्रिया सुरू झाल्यापासून ती पूर्ण होईपर्यंत *(पान २ वर)*

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सहायता मिळाली म्हणून पायाला जिवदान मिळाले

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर येथील रहिवासी राहुल जैस्वाल हा होलाणी दालमिल जवळ आपल्या रहात्या घरुन मोंढया कडे मोटारसायकल ने जात आस्ताना अचानक समोरून डुकर आल्याने त्याचा अपघात झाला यात त्याच्या गुढग्याला जबरदस्त दुखापत झाल्याने त्याला जालना येथील श्री संतकृपा हॉस्पीटल मध्ये हलविण्यात आले होते. डॉक्टर यांनी ऑपरेशन ची फिस कमीत कमी एक दिड लाख रुपये लागतील कारण गुडघ्याच्या आतली गाधी पुर्णपणे डॅमिज झाली होती.राहुलचे वडील माणिक जैस्वाल यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने ते




घाबरले असता त्यांना मदत म्हणून धावून आलेले जालना येथील मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय चे अधिकारी, डॉ.सोपान चव्हाण,व परतूर येथील जिल्हाअध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्ष जालना, दत्ता प्रल्हाद अंभुरे, यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत म्हणून पहिल्या टप्प्यात ४०,०००/- रुपये. व दुसऱ्या टप्प्यात ३०,०००/- रुपये. एकुण ७०,०००/- रुपयांची मदत मिळाली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेब यांनी सुरू केलेल्या *(पान २ वर)*

## पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात प्रभारी तहसीलदार तुषार निकम यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार विक्रांत मोंढे, सतीश तायडे, पी. डी. शिंदे, सहाय्यक महसूल अधिकारी दीपली राऊत (वानखडे) तसेच संपदा कुलकर्णी, जे. जे. वाघ, एस. एस. भोकरे, वृषाली नवले, रिना नगरकर, रवींद्र हेलकट, देशपांडे व अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव दाखल करण्यास ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दी वगळून ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने झालेला भूखंड विकास नियमित करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याची मुदत ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आली आहे. नागरिकांनी या मुदतीत गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्रस्ताव दाखल करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत ३१ डिसेंबर २०२० पूर्वीचे अनधिकृत भूखंड व अनधिकृत भूखंडावरील बांधकाम नियमाधीन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दी वगळता उर्वरित ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने झालेला भूखंड विकास नियमित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील गुंठेवारी कक्षात प्रस्ताव दाखल करण्याची मुदत यापूर्वी ३० जून २०२६ पर्यंत होती. आता ही मुदत ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत प्रस्ताव दाखल न केल्यास किंवा गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र न घेता अनधिकृत भूखंडाची खरेदी-विक्री केल्यास तसेच संबंधित जागेवर अनधिकृत बांधकाम केल्यास ते अतिक्रमण समजण्यात येईल. अशा अनधिकृत व विनापरवाना बांधकामांविरुद्ध महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदींनुसार बांधकाम पाडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांनी मुदतीत प्रस्ताव दाखल करून गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, असे आवाहनही श्रीमती मित्तल यांनी केले आहे.

## मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

**जालना - प्रतिनिधी**

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. श्री. राणे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मोटारीने (समृद्धी महामार्ग) राजेवाडी तलाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी १२.३० ते १.०० वाजता राजेवाडी तलाव येथे आगमन, तलावाची पाहणी तसेच मच्छीमारांसमवेत चर्चा करतील. दुपारी १.०० वाजता मोटारीने सोमठाणा तलाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी १.१५ ते १.१५ वाजता सोमठाणा तलाव येथे आगमन, तलावाची पाहणी तसेच मच्छीमारांसमवेत चर्चा करतील. दुपारी १.४५ वाजता मोटारीने आमदार नारायण कुचे यांच्या संपर्क कार्यालयाकडे, कृषी महाविद्यालयासमोर, बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी २.०० ते ३.०० वाजता राखीव. दुपारी ३.०० वाजता मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## जालन्यात तरुणाच्या खुनाने खळबळ; अल्पवयीन गुन्हेगारीवर आ. खोतकरांची चिंता; दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

गणेश विसर्जनाच्या उत्साहात शहर दंग असतानाच जालना शहरातील मियांसाहेब दर्गा परिसरात तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला करून खून करण्यात आल्याच्या घटनेने शहरात खळबळ उडाली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी चिंता व्यक्त करत गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग वाढत असल्यास त्यावर कठोर उपाययोजना करण्याची गरज असल्याचे म्हटले. उपलब्ध वृत्तानुसार, राहुल राजेंद्रसिंग राजपूत (वय ३०, रा. लोधी मोहल्ला, जालना) यांच्यावर मियांसाहेब दर्गा चौक



परिसरातील दर्गा रोडवर दोन जणांनी धारदार चाकूने हल्ला केला. हल्ल्यानंतर संशयित दुचाकीवरून पसार झाल्याचे वृत्त आहे. गंभीर जखमी झालेल्या राहुल यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात दोन संशयितांना ताब्यात घेतल्याची प्राथमिक माहितीही समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात जाऊन मृत तरुणाच्या नातेवाईकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले तसेच घटनेबाबतची माहिती जाणून घेतली. तरुणाचा अशा प्रकारे मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे सांगत खोतकर यांनी शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. विशेषतः अल्पवयीन मुलांकडून खुनासारखे गंभीर गुन्हे घडत असतील तर ही समाजासाठी चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

अल्पवयीन मुलांचा गंभीर गुन्ह्यांसाठी वापर केला जात *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.